# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्र. २५६५१४३
फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३
E-mail : ronagpur.dte@gmail.com
Website : rdtenagpur.org.in

कालमर्यादित
इमेलव्दारे / सकंतस्थळावर

क्रमांक : तंशिस / प्राकाना / शै.वि / इ.बी.सी / २०१४ / 49 /
दिनांक : 11 FEB 2014

प्रति,
प्राचार्य / संचालक,
______________________
______________________

(सर्व अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका संस्था, एमबीए / एमसीए पदव्युत्तर पदवी, हॉटेल मॅनेजमेंट पदवी / पदवीका संस्था)

विषय:– **शैक्षणिक वर्ष २०१३–१४ चे आर्थिकदृष्टया मागास (EBC) विद्यार्थ्यांचे आक्षेपित अर्ज परत घेऊन जाण्याबाबत.**

संदर्भ:– तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १५ / अर्थसं / ईबीसी / ऑनलाईन / २०१३–१४ / ३२, दि. ११ फेब्रुवारी २०१४

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने, शैक्षणिक वर्ष २०१३–१४ पासून खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थेमध्ये व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क ५० टक्के प्रतिपुर्ती करण्याकरीता या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या अर्जाची तपासणी झालेली असून त्यामधील आक्षेपित असलेले अर्ज आक्षेपाची पुर्तता करण्याकरीता या कार्यालयातून **दिनांक १३/०२/२०१४ पासून** घेऊन जाण्याची कार्यवाही करावी व सदर अर्जामध्ये असलेल्या आक्षेपाची पुर्तता तात्काळ करुन **दि. २४/०२/२०१४ पर्यंत** या कार्यालयात जमा करावे.

ई.बी.सी. ची प्रक्रिया ही शैक्षणिक वर्ष २०१३–१४ पासून ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत असल्यामुळे सर्व प्रक्रिया हया कालमर्यादितच होणे आवश्यक आहे. त्याबाबत दिरंगाई केल्यास पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंजित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आपण दररोज न चुकता या कार्यालयाचे संस्थेतस्थळ व ईबीसीच्या संकेतस्थळावरील मॅसेज बॉक्स बघावे.

सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर.

प्रत:– प्रोग्रामर, हेच कार्यालय यांना वेबसाईडवर अपलोड करण्याकरीता

D:\EBC\EBC-2013-14 Main Folder\EBC General Letter.doc